# चैतन्य सुमने



अंक ०१ बलिप्रतिपदा, दिपावली पाडवा - १४ नोव्हेंबर २०२३

## संपादकीय



एकदा श्री महाराज गोंदवल्यास असताना एक बाई व त्यांची छोटी मुलगी सकाळी सकाळी त्यांचे दर्शन घेण्यास त्यांच्या खोलीवर गेल्या. श्री महाराज पलंगावर पांघरूण घेऊन पडले होते. त्या दोघी आल्यावर त्यांनी एकदम पांघरूण बाजूला केलं व उठले तर त्यांच्या पायाशी २ टपोरी गुलाबाची फुले होती. बाईंच्या मनात आलं की आता इथे आसपास तर अशी फुलं नाहीत ही कशी इथे आली. तेव्हा श्रीमहाराज एकदम म्हणाले की आनंदसागर किंवा ब्रह्मानंदानी मानसपूजेत वाहिली असतील.

आज हा चैतन्य सुमने या नियतकालिकाचा पहिला अंक प्रसिद्ध करताना काहीशी अशीच भावना आमची आहे. चैतन्य स्मरण ही स्मरणिका जवळपास दहा वर्षांनी प्रसिद्ध होणार त्यासाठी संस्थानतर्फे भक्तांना लेख अनुभव वा काव्य देण्यासंदर्भात आवाहन करण्यात आलं. त्यानंतर अक्षरशः लेख व काव्य यांचा पाऊस पडला. सर्व तर काही स्मरणिकेत छापणे शक्य होणार नाही. पण भक्तांची ही शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्याचा फायदा इतर साधकांनाही व्हावा यासाठी दर महिना, दोन महिन्यांनी हे ऑनलाईन नियतकालिक प्रसिद्ध व्हावं अशी कल्पना पुढे आली. त्या दृष्टीने या पहिल्या अंकाची आखणी या दिवाळीच्या शुभमुहूर्तावर करत आहोत.

या नियतकालिकात काही श्रींचे विचार, भक्तांचे अनुभव, काही गत काळातील भक्तांच्या आठवणी, एखाद दुसरे काव्य, श्रध्दांजली, श्रींच्या अनेक उपासना केंद्र वा मंदिर यापैकी एखाद्याची माहिती इ. लेख असतील. प्रसिद्ध झालेले अनुभव वा माहिती ही भक्तांनीच पाठवलेली आहे, संस्थानतर्फे त्याचे कोणत्याही प्रकारे प्रमाणीकरण व उदात्तीकरण करण्याचा हेतू नाही. केवळ अंत:करणपूर्वक केलेली साधना वा प्रार्थना यांना त्यांच्याकडून प्रतिसाद मिळतो व त्यांचा कल्याणमयी हात आपल्या प्रपंचात अनुभवास येतो हे समजण्यास व त्यामुळे आपल्या श्रद्धेस बळकटी येण्यास मदत होईल. हे प्रसिद्ध करण्यामागची हीच भावना आहे. यापुढेही आपले लेख वा अनुभव chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर 'चैतन्य सुमने साठी' अशी नोंद करून पाठवाव्या. आपल्या सर्वांना ही दीपावली मंगल व नाममय जावो व आनंदाचा-समाधानाचा दीप आपल्या जीवनात उजळो हीच प्रार्थना करून ही चैतन्य सुमने श्रींच्या चरणाशी वाहतो.

**– आपले विश्वस्त मंडळ, चैतन्योपासना**




**पू. बाबा बेलसरे यांचे एक नाम साधना शिबीर गोंदवले येथे १९९६ च्या दिवाळी मधे झाले होते. त्यातील पहिल्या निरूपणाचे शब्दांकन खास या दिवाळीनिमित्त!**

आज दिवाळी आहे ना! असं आहे बघा की, तर्कशास्त्रामध्ये एक नियम आहे. आपण जेव्हां एखादं विधान करतो किंवा एखादं वाक्य बोलतो त्याचं उलट करतां येत नाही. मी एक उदाहरण सांगतो, आंबा हा गोड फळ आहे याचं उलट करायचं म्हटलं, सर्व गोड फळं आंबा आहेत तर बरोबर नाही. इतर सुध्दां गोड फळ आहेत. आणखी एक उदाहरण घ्या. माणूस हा मरणाधीन प्राणी आहे. तर असं म्हणतां येत नाही की सर्व मरणाधीन जीव हे प्राणी आहेत. तर मग अशी काही विधान असतात की त्याच्या उलट गोष्टीसुध्दां बरोबर असतात. जेथे संत असतात तेथे नेहमी दिवाळी असते. पण जेथे दिवाळी असते तेथे संत असतात असे म्हणतां येत नाही. होय ना! पण चमत्कार असा आहे, तुकोबा म्हणाले, “विठोबाचे डिंगर आम्ही। आम्हां नित्य दिवाळी॥” तसं हे गोंदवले आहे. जेथे महाराज तेथे दिवाळीच. कां हो? विचाराल, तर त्याचे कारण आहे ते कृष्णमूर्ती होते ना! ईश्वराचे प्रेषित होते. ते काय म्हणायचे, माणसामध्ये आणि प्राण्यामधे काय फरक आहे. तो असा, अरे प्राणी हा प्राणीच राहतो शेवटपर्यंत. उदाहरण घ्या. कुत्रा हा कुत्राच राहतो शेवटपर्यंत कुत्रा कुठेहि न्या कुत्राच, मरेपर्यंत कुत्राच! घोडा हा मरे पर्यंत घोडाच. माणसाचें हे असें नाही. ते काय म्हणायचे? इंग्रजीत म्हणायचे- “Man Wants to become Something.” माणसाला माणूसपणामध्ये समाधान नाही. कुत्र्याचा प्रश्नच नाही पण माणसाला काहीतरी निराळं व्हावंस वाटतं. हा माणसाच्या आणि प्राण्याच्या मनात फरक आहे. तर माणसाला काहीतरी व्हावंस वाटत. तर कृष्णमूर्ती म्हणाले, “Man Wants Satisfaction.” समाधान- Satisfaction.



गंमत अशी आहे की, अलीकडल्या नवीन मुलांना असं वाटतं की, कृष्णमूर्ती कांही नवीन सांगतात बुवा. अरे, ज्ञानेश्वर महाराजांच्यापासून महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर तेच सांगत आले आहेत. समर्थांनी दासबोधांत तीन शब्द वापरलेले आहेत. शांति, आनंद आणि समाधान आणि महाराजांचं

एक वाक्य असं आहे की, समाधान ही श्रीमंती आहे, समाधान हे ऐश्वर्य आहे. समाधान हेंच भगवंतांचं स्वरुप आहे. भगवंताला धरल्याशिवाय माणसाला समाधान नाही. समाधान पाहिजे असेल तर भगवंताला धरला पाहिजे.

मला नेहमी असं कौतुक वाटतं. सध्याचा काळ तुम्ही बघा, किती विचित्र काळ आलेला आहे? ज्ञानेश्वर महाराजांनी नवव्या अध्यायामध्यें तामसी माणसाचं वर्णन केलंय, त्याचं हुबेहुब चित्र जगामध्यें दिसतं. पहिल्यांदा म्हणाले, जिकडे तिकडे अविवेक वाढलाय, नंतर म्हणाले असंतोष भडकलाय्, तिसरं म्हणाले माणसाला चैन पडत नाही, द्वेष आणि मत्सर करतो. असं सगळीकडे आपल्याला दिसतं. अशा वाळवंटाच्या प्रदेशामध्यें, जसं त्या इस्रायल मध्यें वाळवंटामधें नंदनवन निर्माण केलंय्, तसं समाजाच्या ह्या अवस्थेमध्यें महाराजांनी एक नंदनवन निर्माण केलंय की जिथें समाधान आहे. काय सांगू आपल्याला? माणसाला समाधान, समाधान पाहिजे. जेथें महाराज तेथें समाधान, जेथें महाराज तेथें आनंद, हे मी महाराजांच्याबद्दल बोलतोय् असं नव्हे, जो संत आहे तिथें हे असलंच पाहिजे. मी आपल्याला सांगितलं ना! संत आहे तिथें आनंद, आनंद म्हणजे संत. किंबहुना आपल्या महाराष्ट्रात अशी परंपरा आहे, एक अठरा वर्षाचा मुलगा, लोकांनी टाकलेला, वाळीत टाकलेला संन्याशाचा मुलगा म्हणून, त्याची ही झेंप काय आहे? "अवघाची संसार सुखाचा करीन! आनंदे भरीन तिन्ही लोक!" अरे, तुम्ही आम्ही व्यवहारामध्ये मोठे होऊन आपला प्रपंच आनंदाने भरतां येत नाही. तिथें हा संन्याशाचा मुलगा इथें म्हणतोय की, संबंध विश्व मी आनंदाने भरुन टाकीन. अशी संताची शक्ति असते. ती इथें अनुभवायला येते बघा. जिथे महाराज तिकडे दिवाळीच.



आतां प्रश्न असा आहे की आपण जर घरी राहिलो असतो तर? दिवाळी म्हणजे आनंद नाहीच, फटाके फार महाग झालेत सध्या बरं का! इथें पहावं तर आनंदाला उधाण आलं आहे. काय असेल मला सांगा, इथे येऊन जर काही मिळवायचे असेल तर समाधानाची कला मिळवायची आहे. मग ज्या पुरुषानी ८० वर्षापूर्वी समाधानाचा मार्ग दाखवला, तो मार्ग काय आहे हे समजून घेण्यासाठी हे शिबीर आहे. त्याचा हेतू काय आहे हे समजून घेण्याकरतां हे शिबीर आहे. "अरे! तुला समाधान हवं ना! मी तुला समाधानाचा मार्ग दाखवतो बरं!" म्हणून आपण सर्व इथें एकत्र आलेलो आहोत. म्हणून काही सांगायच्या आधी माझा पहिला नमस्कार असेल तर त्या पुरुषाला आहे. काय सांगाव त्यांचं! जन्मापासून मरेपर्यंत एका समाधानाशिवाय दुसरी भाषा नाही केली त्यांनी बरं! आणि आता मी सांगितलं, की परमात्मा हा समाधानरुप आहे. तर परमात्मा

म्हणजे शांत, परमात्मा म्हणजे आनंद, परमात्मा म्हणजे समाधान. जेथे समाधान आहे त्याला धरा तुम्ही, म्हणजे तुम्हांला आनंद मिळेल, समाधान मिळेल हे त्यांचं म्हणणं. त्याला धरा तुम्ही. तर तो मार्ग काय आहे? म्हणून पहिला नमस्कार त्यांना! दुसरा नमस्कार असा आहे की, एवढं सगळं अवाढव्य, दिवाळीची खटपट करायची. ती सत्ता काय आहे? सत्ता कशी आहे, तर सत्ता ही आणि शक्ति ही केव्हांही वाहकाच्या द्वारे, व्यक्तिच्याद्वारे व्यक्त होते. ज्या व्यक्ति ही सत्ता व्यक्त होण्याला निमित्त होतात त्या पंचांना दुसरा नमस्कार, आपण असं समजू नका की मी पंचाची उगीच तारीफ करतो. त्या आपल्या सारख्या व्यक्तिच आहेत, गुणदोष आहेतच त्यांच्यात. पण एवढा समाजाच्या भार डोक्यावर घेऊन, एवढे श्रम करुन त्या सत्तेवर विश्वास ठेवून दिवाळी साजरी करायची ही फार विलक्षण गोष्ट आहे. म्हणून त्यांना नमस्कार दुसरा आणि तिसरा, आपल्या सगळ्या अडचणी आहेत, असं सगळं असताना, तुम्ही इथें सर्वजण आलात, इतक्या एकोप्याने राहिलात, इतक्या शांतपणें तुम्ही माझं ऐकायला बसलात म्हणून तुम्हांला नमस्कार. हे तीनही माझे नमस्कार तुम्ही अगदी ग्रहण कराच.

**दिवाळी हा आनंदाचा दिवस असतो. पण दिवाळीचा दिवस हा इतर दिवसांसारखाच असतो; इतकेंच नव्हे तर आदल्या दिवसाची परिस्थिती, संकटे आणि अडचणी त्यादिवशीही कायम असतातच. याचा अर्थ असा की, परिस्थितीत बदल होत नाही. दिवाळीचा दिवस हा दिवस या नात्यानें निराळा नाहीं. पण काल आपण जें केलें तें दिवाळीच्या दिवशीं आपण करत नाहीं; हाच मुख्य फरक होय. आपणच दिवाळीच्या दिवसाला आनंदाचा दिवस करतों. हें जर खरें तर तसा तो आपण नेहमींच कां करूं नये? आपल्याला नेहमींच दिवाळी असावी, आपण नेहमींच आनंदात असावे.**

**- श्री महाराज**

आतां विषय सांगतो. आतां मी सांगितलं ना! माणसाला समाधान पाहिजे. मग जर समाधान पाहिजे तर तो मार्ग असा असला पाहिजे की तो आरंभापासून अंतापर्यंत समाधानाचाच असला पाहिजे. तो समाधानस्वरुप कसा! तर असं बघा एक जर्मन विचारवंत होऊन गेला लढाई नंतर, तो काय म्हणतो, मनुष्य कितीहि वाईट वागणारा असो, कितीहि अवगुणी असो त्याचं स्वतःवरच प्रेम तो कधी कमी होऊ देत नाही, 'मी' मला नको असं कधीच होत नाही. जगांत दुसरी माणसं नको असं होईल, नातेवाईक नको असं होईल, राज्यकर्ते नको असं होईल पण मला माझी नावड उत्पन्न झाली असं नाही. कारण माझं मूळस्वरुप आत्मस्वरुप आहे आणि ते आनंदस्वरुप आहे. म्हणून मी मला नको असं कधी होत नाही. मग, जर मी मला नको असं कधी होत नाही तर मग जीवनामध्यें कष्ट, दुःख, कंटाळा हें कां येतं? तर असं होतं की, माझं खरं स्वरुप जे आहे तें मी विसरलेलं आहे. म्हणून मूळ खरा जो आहे तो विसरल्यामुळे ही सर्व भानगड निर्माण झाली. ती जी वृत्ति आहे तिला संत देहबुद्धि म्हणतात. ती म्हणजे मी देहच आहे. अरे, तूं तो नाहीस, तुझा जो आहे तो आंतला निराळा आहे, म्हणून समर्थांनी मनाच्या श्लोकांत सांगितलं, 'देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी। सदा संगति सज्जनांची धरावी॥' आत्मबुद्धी करावी. अहो पण कशी करावी? तर सदा संगति सज्जनांची धरावी. संत कोण? हे, मी सांगितलं आपल्याला. परमात्मा समाधानस्वरुप आहे. समाधानस्वरुप परमात्म्याला ज्यांनी इतका आत्मसात् केलाय की स्वतः भगवत्स्वरुप झाला. तुका झाला पांडुरंग, अशी अवस्था ज्याची आहे.

एकदां काय झालं? महाराज असे दिवाळीत स्नान करीत होते. म्हणून सांगायचं औचित्य त्याचं! तेव्हां लहान मुलं, बायका, पुरुष सगळे महाराजांना स्नान घालीत होते. कौतुक आहे हो फार! तुम्हांला सांगू कां? आपल्याकडे संतांचं म्हणतात बालोन्मत्त पिशाच्चवत्! बरं कां! महाराजांच्या अंगी, एक नव्हे,– क्षमा करा मला!– तिन्ही होते. बाल, तुम्ही म्हणाल, पिशाच्च कसलं आलंय्. त्यांचे गुरु होते ते तसेच होते. पण काही वेळेला महाराज असे विचित्र वागत. अरे

बापरे, यांना संत कसं म्हणावं असे वाटे. बरं का! तेव्हां ब्रह्मानंद महाराज, (ज्यांनी महाराजांना खरं ओळखलं) ते सातआठ पावलावर उभे होते आणि भाऊसाहेब केतकर बरोबर होते. तेव्हां त्यांच्या डोळ्याला पाणी आलं, म्हणाले, “भाऊसाहेब, प्रत्यक्ष राम आहे हो राम!” म्हणाले. बघा, अशा ज्ञानी पुरुषाला जे खरं दिसलं ना! ते महाराजांच खरं स्वरुप आहे, म्हणजे समाधान स्वरुप आहे. मग खरं हे जर आहे तर त्यांनी सांगितलेला मार्ग कोणचा? तर ते काय म्हणाले, आतां होतंय काय, माझं जे खरं स्वरुप आहे ते मी विसरुन जातोय, एक त्यांनी उदाहरण फार छान दिलं, ते म्हणाले, वस्तू माझी आहे, माझा मुलगा, माझं घर, माझा पैसा, माझे नातेवाईक, जे जे माझं आहे तें ‘मी’ नव्हे, माझा मुलगा म्हणजे मी नव्हे, माझं घर म्हणजे मी नव्हे, असं सगळ असताना हा जर पडला खाली तर ‘मी पडलो’ असं म्हणतो. ‘माझा देह पडला’ असं म्हणायला पाहिजे कारण मी माझा देह म्हणतो, माझा हात, माझा पाय, माझं डोकं, तर हे पडल्यानंतर मी पडलो कां म्हणतोस तूं? हा घोटाळा झालेला आहे तो कोणामुळे झाला? तर मी तो नसून, मी देहच आहे हा तो घोटाळा झाला, मग देहाला मी ओळखतो कसा? माझ्या नावानी ओळखतो. महाराज एक चमत्कार सांगत, जीवनाचा चमत्कार, तो असा- जो जन्माला येतो पुरुष किंवा स्त्री, म्हणजे माणूस जन्माला येतो, तो नाव घेऊन येत नाही, तो नुसताच येतो. लहान मूल म्हणून आणि मग आई, वडिल किंवा लोक त्याला नांव ठेवतात. हे नांव मी ठेवतो, माझ्या मुलाला, मुलीला, काय असेल ते, आणि ते नाव इतकं ‘मी’ शी तादात्म्य पावत की,... त्याला ते उदाहरण द्यायचे. एक चार पाच माणसं निजलेली आहेत आणि गाढ निजलेली आहेत. त्यांत एक नारायणराव आहे. नारायणराव दिसायला चांगला आहे, गोरा आहे, त्याला उठवायचाय् - चार माणसं झोंपी गेलेली आहेत आणि एक मनुष्य आला आणि म्हणाला, “अरे, सरळ नाकाच्या माणसा, उठ!” उठायचा नाही “अरे गोऱ्या माणसा उठ!” नाही, “अरे चार मुलांचा बाप आहे उठ!” तर नाही उठायचा, पण “नारायणराव उठ!” म्हटलं की, “आँ,” उठला. तर, हे जसं, लोकांनी दिलेलं नांव इतकं खोल जातं आणि त्याच्या जीवाशी तादात्म्य पावत. तसं संतानी भगवंताला दिलेल नांव भगवंतानी आपलंस करुन घेतलेलं आहे. भगवंताशी तादात्म्य आहे त्या नावाचं, त्या नावानी हांक मारली की परमात्मा आलाच बरं! हांक मारण्याची खुबी आहे. त्याचं वर्णन पुष्कळ केलं त्या नारायणरावाचं केलं तसं! पण त्याला जे संतांनी नांव ठेवलंय्, आपण जे नांव घेतो ते संतानी त्याला दिलेले आहे, त्या नावांनी हांक मारल्याबरोबर येतो. नाही? हां त्याचा पर्याय काय आहे पुन्हा! तर त्याचा पर्याय असा आहे, बरं का ! म्हणजे समजा, आपण इथें बसलोयत ना, कां हो इथला कलेक्टर कोण आहे? इतकी माणस इथें आपण आहोंत माझ्यासगट, नाही सांगता येणार. पण समजा तुम्हांला कलेक्टरला कांही कळवायचाय् तर तुम्ही काय करतां? त्याचं नांव लिहितां, त्याचा पत्ता लिहिता -To The Collector. ते कलेक्टरला पोहोंचत की नाही? तसं परमात्मा हा कसा आहे, कोठे आहे, जगातला मालक आहे, कोण आहे मला माहिती नाही पण नावानी जर त्याला हांक मारलीत, पत्र लिहिलंत् तर बरोबर तो तुम्हांला उत्तर देतो आणि हे नाव संत आपल्याला देतात. एक गृहस्थ होते ते म्हणाले, महाराज आपण मला काहीतरी द्या. तर महाराज म्हणाले, “अरे, माझा प्राण मी तुला दिलेला आहे, भगवंताचं नाम हा माझा प्राण आहे तो मी तुला दिलेला आहे. आणखी काय देऊ?” बरं का! तसं, आपण दिवाळी जर साजरी करायची असेल तर, आपण जर खरोखर त्याच्या नामात राहिलो, त्यांनी दिलेलं नाम जर आपण जपलं, मनापासून जपलं तर महाराजांना आपल्यापासून वेगळं राहतां येणारच नाही. कारण ते आत्मस्वरुप आहेत. आणि एक

मी माझ्या अनुभवानें सांगेन की एका नामामधें महाराज सांठवलेले आहेत. ध्यानात धरा आपण. आणि त्यांतहि सांगतो, की त्याला त्यांच्या तोंडानीच आलं पाहिजे असं नाही. मी सुद्धा इथेंच पादुकांच्यावर नाम घेतलेले आहे. परंतु महाराजांच सान्निध्य आपल्याला नामाने लाभतं यांत शंकाच नाही. आणि त्याच्यात मजा अशी आहे, मघा जे सुरुवातीलाच सांगितलेलं आहे की, मांजर हे मांजरच राहील पण माणूस हा बदलेल. बदलेल म्हणजे देह बदलणार नाही पण आपल्याला तो अभंग माहीत आहे ना तुकाराम महाराजांचा! "आधी होता वाघ्या। दैवयोगे झाला पाग्या॥ त्याचा येळकोट राहीना। मूळ स्वभाव जाईना॥" हा अप्रतिम दृष्टांत दिलेला आहे. तो अभंग सांगायचा काही आजचा प्रसंग नाही पण लक्षांत घ्या. "आधी होता ग्रामजोशी। राज्यपद आले त्यासी॥ त्याचे पंचाग राहीना। मूळ स्वभाव जाईना॥" हा अप्रतिम दृष्टांत दिलेला आहे. आणि मग सांगितलं शेवटी- "आधी होता संतसंग।... अरे त्यांनी हा मार्ग सांगितला आहे. "आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग॥ त्याचे भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना॥" काय अप्रतिम आहे. तुका पांडुरंग झाला म्हणजे काळा झाला, विटेवर हात ठेऊन उभा राहिला, दगड झाला कां! नाही, त्याचं जे मन होतं, देहबुद्धीचं मन ते आत्मबुद्धीचं, परमात्मस्वरुपाचं झालं. त्याला मन उन्मन झालं असं म्हणतात. अरविंद त्याला Supra mind, म्हणतात Supramental. या मनाच्या वरचं मन. या नामानें काय होतं? आतलं मन जे आहे, ते सुंदर परमात्मस्वरुप मन बनतं आपलं. त्याला विश्वमन असं म्हणतात. Cosmic mind!

सांगण्याचा हेतू काय आपल्याला तर आपण जे हे शिबीर भरवतो आहोत त्यांतून तो मार्ग काय आहे हे पहायचंय्. आपल्याला शांती पाहिजे आहे. आणि शेवटी सांगतो आपल्याला, पहा जगामध्यें किती अशांती, अशांती... कुठेही जा. ज्यांच्या जवळ अलोट पैसा आहे, जगातील सर्व सुख हाताशी आहेत त्याला शांती नाही. ज्याची प्रकृति उत्तम आहे त्याला शांती नाही, जो रोगी आहे त्याला शांती नाही, ज्याला सत्ता नाही, ज्याला आली त्याला शांती नाही. आपल्या शेक्सपीयरच वाक्य प्रसिद्ध आहे ना ! Uneasy lies the head that wears the crown. भीति, काळजी तळमळ यांनी जीवन संबंध ग्रासलेलं आहे. अरे, त्यांतून बाहेर पडायला मार्ग असेल तर संतांची संगत पाहिजे. त्या संगती मध्ये पडायला नाम पाहिजे आणि ते नाम जो घेईल त्याला शांती आणि समाधान असलंच पाहिचे. त्यांत शंकाच नाही. असा आहे संतांचा चमत्कार, तर म्हणाले, एका माणसानें अत्तर लावलं त्याचा वास तो तर घेतोच पण इतरांना सुद्धा येतो तसे संताच्या अवतीभोंवती आनंदाशिवाय असतंच नाही काही. काय सांगावं आपल्याला! एक लहानस उदाहरण सांगतो आपल्याला, फार ऐकण्यासारखं आहे. बापूरावांचे वडील होते गणपतराव दामले म्हणून - त्यांचा एक व्यापार होता लहानसा, तेव्हां महाराज सोलापूरला होते आणि त्यांच्या व्यापारांत त्यांना नुकसान आलं. नुकसान आलं, हवालदिल झाले, तेव्हा ते उठले आणि सोलापूरला गेले, तर महाराज चपळगांवकर नांवाचे गृहस्थ होते त्यांच्या असे घरांत होते, ते बाहेर आले आणि गणपतराव समोर आले. महाराज म्हणाले, "अरे, तात्या तुम्ही इकडं कुठे?" अगदी उदास चेहरा आणि अगदी दुःखी झालेले, म्हणाले "महाराज, फार नुकसान झालं" महाराज "या" म्हणाले, महाराजानी टांग्यांत बसवलं आपल्या शेजारी "किती नुकसान झालं?" गणपतराव म्हणाले "दोन हजार रुपयांचं नुकसान झालं" तर महाराज, "एवढंच ना, मी देतो" म्हणाले. एक पैसा दिला नाही बरं का त्यांनी, हे लक्षांत ठेवा. पण "मी देतो" म्हणाले, आणि तात्या सांगत, "चार दिवस मी तेथें होतो, मी विसरुनच गेलो की माझं नुकसान झालेलं आहे." ही खरी संतांची कमाल आहे,

आणि हे नामानी साधतं हे लक्षांत ठेवा आपण. कारण नाम हा त्यांचा प्राण आहे. तेव्हां आपल्याला शिकायचं असेल तर भगवंताचं दर्शन होण्याला जो मार्ग आहे, त्यांनी सांगितलेला आहे, तो मार्ग काय आहे याची आपण चौकशी करायची आहे. आजची गंमत काय आहे, ह्याला कृष्णमूर्तींच्या व्याख्यानांत त्यांनी नांव दिलंय् 'Eagle's Flight' म्हणजे गरुड पक्षी आकाशामध्यें उडतो ना! तेव्हां तो उडतांना- रेल्वे लाईन सारखे रुळ नव्हे- तर त्याचा स्वतंत्र मार्ग असतो, तसा म्हणाले ईश्वरप्राप्तीचा मार्ग असतो. असं त्यांचं म्हणणं. पण महाराजांचा दृष्टान्त फार छान आहे. महाराज म्हणाले, मुंबईहून अलिबागला जायला दोन मार्ग आहेत. एक समुद्राचा मार्ग, आणि दुसरा म्हणाले मोटारचा मार्ग! तर मोटारचा मार्ग कसा, तर पायऱ्या, दगड दिसतील, आपले मैलाचे दगड दिसतील आणि पाण्याचा जो मार्ग आहे त्याला दगड दिसणार नाहीत, खुणा दिसणार नाहीत पण मार्ग बरोबर आहे, जाईल, म्हणाले. तसं नामाचा मार्ग हा बोटीनी जायचा मार्ग आहे, अंतर कापील पण त्याला वाटणार नाही, मला हे दिसले, रंग दिसले, रुप दिसलं वाक् सिद्धि आली हे नाही पण अंतर बरोबर काटेल. अरे, बाकीचे मार्ग आहेत त्यात, ते म्हणाले, दगडाच्या खुणा दिसतील पण त्यामध्यें धोका असा आहे की, दिसल्यावर अहंकार यायचा संभव आहे मार्गामध्ये अडकायचा संभव आहे. तेव्हां नाम काय आहे? जे साधायचे ते नामानें साधेल पण नामानें साधेल त्याच्यात दोष राहाणार नाही.



तेव्हा याची चौकशी (विचार) आपण चार दिवस (शिबिरात) करु. तेव्हां आपल्याला खरं सांगायच तर... तुकाराम बुवांची काय अवस्था असेल, घरी खायला नाही, बायको अनुकूल नाही, परिस्थिति अनुकूल नाही, गावात मान नाही, असं सगळं असतांना, "विठोबाचे डिंगर आम्ही। आम्हां नित्य दिवाळी॥" काय असेल (तऱ्हा) मला सांगा त्या आनंदाची! आनंदाचा माज आहे. 'माज आहे' बरं कां? सांगू कां... सांगतो, दारू पिणाऱ्यांचा अनुभव, माझा नव्हे हं! काय आहे, ध्यानांत ठेवा. त्याच्यामधें नशा चढते ना. सुफी लोक फार विशेष सांगतात, चढली कीं, माणूस बेहोश होतो. आमच्या तिकडे मोंगलाईमध्ये तिकडे दारूबंदी वगैरे नव्हती. तिथें मुसलमान वगैरे लोक दारू प्यायचे आणि गटारांत लोळायचे. तेव्हां तू कोण आहेस? "आप कोन है?" तो "मैं बादशाह हूं" म्हणायचे, गटरांत लोळायचा लेकाचा, ही नशा! त्याच्या मध्यें लक्षांत ठेवा, नशा चढली तरी ती कायम राहात नाही आणि ती उतरायला लागली की पूर्ण शुद्धीवर नाही आणि नशा पूर्णहि नाही, म्हणजे अशी मधली अवस्था येते- पूर्ण नशा नाही आणि पूर्ण उतरलेली नाही. ती जी मधली अवस्था आहे त्याला खुमार असं म्हणतात. खुमार, बरं का? त्या मध्ये आनंदाचं स्मरण असतं आणि अजून देहबुद्धि आलेली नाही अशी जी अवस्था आहे ना, त्या

अवस्थेमधें भगवंताच्या नामाची खूण आहे असं नानक म्हणतो. काय आहे! उदाहरण सांगतो आपल्याला. या नानकाला, –आग्र्याचा किल्ला बाबर बांधत होता– बांधतांना लोक धरून आणले, त्यांत नानक सापडला. त्या तिथं उन्हाळा फार, तिथें दुपारी बारा वाजतां भांग देत असत. म्हणजे थंडाई अशी. बिगारी लोकांना. हा तिथें काम करीत नव्हता आणि भांग नको म्हणाला. तेव्हां बाबर किल्ल्याचं काम कसं चाललंय हे पहायला आला. आल्यानंतर त्यांनी विचारलं तुरुंग अधिकाऱ्याला, 'काय रे काम कसं चाललंय?' 'हुजुर, सगळं काम बरोबर चाललंय् पण एक कैदी आहे तो काम ही करीत नाही आणि भांगहि घेत नाही.' बुलाव म्हणाले उसको, बोलावलं त्याला आणि त्याला विचारलं 'अरे, काम करीत नाहीस ठीक आहे. अरे पण तूं भांग का घेत नाहीस?'

## नाम खुमारी नानका चढी रही दिनरात

तर त्यांनी काय सांगितले 'भांग तमाखू धत्तुरा। उतर जात परभात।' तुम्ही भांग घेतलीत, धोतऱ्याच फूल घेतलत तर तुम्हाला माज आणणारं, नशा आणणारा पदार्थ घेतलात, भांग तमाखू धत्तुरा उतर जात परभात। अहो रात्री घेतलेली सकाळी उतरते ना! 'नाम खुमारी नानका। चढी रही दिनरात॥'

पण नामाची ही खुमारी आहे, ती नशा आहे पण नशा उतरली तरी खुमार टिकतो, तो खालीच येत नाही, आणि हे आपल्याला मिळवायचं आहे. आपल्याला नशा चढली तर भाग्यवान् पण ती फारच मोठी माणसं! पण आपल्याला नामाची खुमार तरी आली पाहिजे. अहो तुमच्या घरांत तुमची बायको एवढी आजारी आहे आणि तुम्ही इतके खुशमिजाज कसे! (त्याला असं वाटेल) 'त्याला काय आहे। परमात्मा करील' (पण) याचा गैरवापर करूं नका हं! नाहींतर "आम्हांला गोंदवल्याला ऐकायला मिळालय, तुझं तूं औषधपाणी कर आपलं," असं नका करुं हं! पण काय नानकाचं तेज आहे. बाकीचं जाऊ दे, नाम खुमारी नानका चढी रहे दिनरात. म्हणजे व्यवहार तर चाललेला आहे आणि मस्तीची मस्ती आहे. हे आपल्याला शिकायचंय, मग ९ वाजता परमात्म्याच्या काय खुणा आहेत त्याचं वर्णन करण्याचा मी प्रयत्न करीन.

॥ जानकी जीवन स्मरण जय जय राम ॥

*संकलन व प्रकाशचित्र : श्री राजाभाऊ मराठे*

काव्य सुमने

## भजन

राम नाम घ्या हो, तुम्ही सर्व सज्जन
राम नाम अमृत पान ।
नका करू त्याचा अवमान ।
राम नाम घ्या हो, तुम्ही सर्व सज्जन ॥धृ.॥
राम नामे वाल्या तरला ।
पापातूनही मुक्त झाला ॥
कृष्ण नामे गोपी रंगल्या।
राम नामे शंभू निवाला ॥
राम नाम घ्या हो, तुम्ही सर्व सज्जन ॥धृ.॥

राम नाम अमृत पान ।
नका करू त्याचा अवमान ।
राम कर्ता तोची करवीता ।
का हो करीता ऊगाच चिंता
राम नाम सदा सेवावे, ।
त्याचे चरणी लीन व्हावे ।
गुरू चरणी हीच प्रार्थना ॥
राम नाम घ्या हो, तुम्ही सर्व सज्जन ॥धृ.॥

सौ. कुसुम गोविंद ठाकूर

# 'अमृतवाणी' आणि मी

– डॉ.मनोहर वर्टीकर

विचार सुमने

१९९२ साली 'अमृतवाणी' पुस्तक प्रकाशित झाले आणि श्रीमहाराजांच्या प्रश्नोत्तरामुळे ते लोकांना अतिशय आवडले. श्रीमहाराजांनीच हे काम करून घेतले ह्याची खात्री आहे व त्यामुळे त्याबद्दल अभिमान वाटत नाही, पण तरीही कोणीतरी कौतुक केले की मनाला कधीकधी बरे वाटते. 'महाराज काय काडीकडूनही काम करवून घेऊ शकतात' ह्या माझ्या उत्तरावर काही जण म्हणतात, "कोणाकडूनही काम करवून घेऊ शकतात हे कबूल, पण आम्हाला न निवडता तुम्हालाच का निवडले?" मला जे कारण वाटते ते असे–

एका वर्गात एक मस्तीखोर मुलगा होता. अभ्यासाच्या बाबतीतही तो दिवेच लावायचा. वर्गातल्या मॉनिटरचे ऐकायचा नाही. मॉनिटरही त्याला घाबरून असायचा. वर्गशिक्षक अतिशय हुशार. त्यांनी काय केलं? त्या मस्तीखोर मुलालाच मॉनिटर बनवले. वर्गातल्या सर्व मुलांचे होमवर्क तपासायची जबाबदारी त्याच्यावर असे. त्याचे होमवर्क शिक्षक तपासत. वर्ग शांत ठेवण्याची जबाबदारीही त्याच्यावरच असे. त्यामुळे आपसूकच त्या मस्तीखोर मुलाची मस्ती कमी झाली. अभ्यासही वेळच्यावेळी होऊ लागला.

मला वाटतं, श्रीमहाराजांनीही असाच विचार केला असावा. ह्याने आपला अनुग्रह घेतला आहे, आपल्या वर्गात बसला आहे. पण दिलेला नामस्मरणाचा अभ्यास न करता विषयांच्या दंगामस्तीत रमतो, तेव्हां आता काहीतरी उपाययोजना करायलाच हवी व म्हणूनच 'अमृतवाणी' साठी त्यांनी माझी निवड केली असावी. आता झालं काय? अमृतवाणी साठी श्रीमहाराजांची प्रश्नोत्तरं गोळा करण्यासाठी श्रींशी संबंधीत विविध पुस्तकांचे वाचन करावे लागले. श्रींनी कुठे काय म्हटले आहे ते शोधावे लागले. त्यांचे टांचण करून वर्गीकरण करावे लागले. त्यामुळे साहाजिकच सतत श्रींचे अनुसंधान राहू लागले. पण अजूनही नामस्मरणात असायला हवी तेवढी गोडी निर्माण झाली नाही. अर्थात श्रीमहाराजच आणखी काही उपाययोजना करतील याची खात्री आहे. 'अमृतवाणी' विषयी मनात अभिमान उत्पन्न होऊ नये म्हणून तीन गोष्टींची मी नेहमी आठवण ठेवतो. श्रीमहाराज आपल्या भक्तांचा सूक्ष्म अहंकार कसा घालवतात त्या ह्या गोष्टी.

१) **नामावतारात** – अहमदाबादला श्रीमहाराजांचे विविध उत्सव नेहमी साजरे होतात. अशाच एका पुण्यतिथीच्या दिवशी काही श्रीभक्तांनी माझे वडील ती. अण्णा वर्टीकर यांचे कौतुक केले व त्यांच्यामुळेच हे उत्सव साजरे होतात असे म्हटले. अण्णांनी 'असे म्हणू नका, श्रीमहाराजांमुळेच हे शक्य होते' असे सांगितले, पण मनात कुठेतरी 'अहं' संतोषला गेला होता. आणि एवढ्यात समोरील श्रीमहाराजांच्या फोटोतून अण्णांना आवाज आल्याचे जाणवले. श्रींनी विचारले, "काय रे ताजमहाल कोणी बांधला?" आणि उत्तर ठरलेलेच होते–'शहाजहानने' आणि

एकदम अण्णांचा सूक्ष्म अभिमान गळून पडला. 'जरी ताजमहाल मजूरांनी बांधला, तरी त्यामागची प्रेरणा व खर्च शहाजहानने केला असल्यामुळे तो शहाजहानने बांधला असेच आपण म्हणतो. त्याप्रमाणेच उत्सव श्रीमहाराजच करवून घेतात, आपण सगळे त्या कामावरचे मजूर आहोत, फार तर मी लक्ष ठेवणारा मुकादम असेन एवढेच. खरे कर्तृत्व श्रीमहाराजांचेच ' याची जाणीव श्रींनी अण्णांना करून दिली.

२) **सगुण अवतारात** – एका श्रीभक्ताने महाराजांना सांगितले, "महाराज, मला माझ्या कामाच्या व्यापात मोठा नेम काही पाळता येणार नाही. तेव्हां एखादा सोपा नेम सांगाल का?" श्रीमहाराज हंसले व म्हणाले,"अगदी सोपा नेम सांगतो. जेवायला बसला की पहिला घास तोंडात घेण्याआधी एकदा 'श्रीराम' म्हणायचे, काय जमेल ना?" "महाराज, हे न जमायला काय झालं?" आणि एक दिवस पंगती वाढून झाल्या आणि महाराजांना यायला उशीर झाला. श्री आले तसे घाईघाईत  म्हणाले, "अरे! मला उशीर झाला, जेवण थंड झाले असेल. चला, भरभर सुरुवात करा." त्या गृहस्थांनी पण घाईघाईत जेवण सुरू केले. त्याबरोबरच हळूच हसून श्रीमहाराजांनी त्यांना विचारले,"काय? 'श्रीराम' म्हटले ना?" ते गृहस्थ ओशाळले व त्यांना जाणीव झाली की, 'इतका सोपा नियम पाळण्यात कसली चूक होणार असा मला जो अभिमान झाला होता, ते माझे चुकलेच. श्रींच्या कृपेशिवाय काहीच करणे जमणार नाही.'

३) **वाणीरूप निर्गुण अवतारात** – गोंदवल्यात एक दिवस काय झालं कुणास ठाऊक, पण अचानक स्वयंपाक खोलीतील बायकांनी स्वयंपाक बनवण्यास सुरुवातच केली नाही. तेथील एका सेवकाने श्रींच्या कानावर हे घालत सांगितले की 'अजून स्वयंपाकाला सुरुवात केली नाही, रामाला नैवेद्य कसा दाखवता येणार?' श्रीमहाराज एवढंच म्हणाले,"त्यांना जाऊन सांगा, त्यांनी स्वयंपाक केला नाही तर रामाला नैवेद्य होणार नाही असे त्यांना वाटते का? लाकडं आपोआप चुलीत जातील. भाताचं आंधण ठेवण्याचं पातेलं आपोआप चुलीवर ठेवलं जाईल व रस्त्यावरून जाणारा एखादा माणूस न बोलवताच आपणहून येऊन स्वयंपाक करून जाईल." अर्थात स्वयंपाकगृहात श्रींचा निरोप पोहोचताच फटाफट स्वयंपाकाला सुरुवात झाली. ह्यावरून एखाद्या काडीकडूनही मी काम करवून घेऊ शकतो या श्रींच्या उक्तीची प्रचिती येते.

थोडक्यात म्हणजे कोणत्याही रूपात श्रीमहाराज आपल्या भक्ताचा अभिमान कमी केल्याशिवाय राहाणार नाहीत. एका भक्ताने श्रींना विचारले, "महाराज, आपल्याला अभिमानाची एवढी चीड का आहे?" श्री म्हणाले, "'हा देहच मी आहे' पासून अभिमानाचा गुंडाळा सुरू होतो. म्हणून जीवनामध्ये दु:खाला मुख्य कारण काय असेल तर अभिमान आहे. माझ्या माणसामध्ये असलेले ९९ दोष मी क्षमा करतो, पण माझ्या माणसामध्ये आलेला अभिमान मला सहन होत नाही. तो अभिमान काढण्याकरता त्याच्या हातात झोळी द्यायलासुद्धा मी मागेपुढे पहात नाही." एकंदरीत अभिमानातील अ चा विचार करणे सुद्धा अविचार ठरेल हेच खरे.

'अमृतवाणी' लिहित असताना सहज मनात विचार आला – पुस्तकाचे नांव 'अमृतवाणी' हे योग्यच आहे, पण श्रीमहाराजांची ही अमृतवाणी म्हणजे खरं काय? एखादी वस्तू नाशिवंत नसली तर आपण त्या वस्तूला 'अ-मृत' म्हणतो. आपले बोलणे इतरांनाच काय पण आपल्याला स्वतःलाही काही दिवसांनी लक्षात राहात नाही, पण श्रीमहाराजांचे सांगणे त्यांनी समाधी घेऊन ११० वर्षे झाली तरी अजून सर्वांच्या लक्षात राहिले आहे. श्रीमहाराजांचा उपदेश, सांगणे हे अगदी सोपे, कोणालाही समजेल असेच आहे. ज्या व्यवसायातला भक्त असेल त्याला त्याच्याच

विचार सुमने

व्यवसायातील उदाहरणं देऊन श्रीमहाराज परमार्थ कसा साधायचा ते समजावून सांगतात. एखादा संत नामाविषयीकधीच काही बोलणार नाही कारण नाम हे अंतरंगात रुजवायचे बीज आहे, तर एखादा संत देह ठेवेपर्यंत सतत नामाविषयीच बोलत राहील कारण नामाचा महिमा, नामाचे महत्त्व सांगून कधीच संपणार नाही. श्रीमहाराज दुसऱ्या प्रकारचे संत होते व म्हणून ते म्हणाले,"नामाचा विसर? आणि तोही मला? नाम विसरलो असतो तर मी मेलोच असतो!" अशा ह्या नामयोग्याचे बोलणे कधीतरी विस्मरणात जाऊ शकेल का? व म्हणूनच श्रींचे बोलणे हे 'अ-मृत वाणी' आहे.

संत श्रीनामदेव महाराज म्हणतात, 'अमृताहूनि गोड नाम तुझे देवा' जर नाम अमृताहून गोड असेल, तर त्या नामाविषयी सांगितलेलं किती गोड असेल! श्रीमहाराजांचे बोलणे, उपदेश हा त्यांच्या भक्तांविषयी असलेल्या प्रेमापोटी झालेला आहे. आपल्या भक्तांविषयी वाटणारी कळकळ, त्यांचा उद्धार व्हावा यासाठी असणारी तळमळ आणि आपला भक्त परमार्थ मार्गावर अजून पुढे का जात नाही याबाबतची हळहळ यामुळेच श्रींना सतत नामस्मरणाची महती सांगावी लागली. तर अशा अमृतापेक्षाही गोड असणाऱ्या नामाविषयी गोड, मृदु भाषेत केलेला उपदेश हा 'अमृतवाणी'च असणार.




एखादा रुग्ण बेशुद्धावस्थेत असेल, त्याचे हृदय व श्वास चालू असेल पण त्याची शुद्ध हरपली असेल तर तो नॉर्मल आहे असे आपण म्हणू का? खरं तर तो मृतावस्थेतच असतो, फक्त त्याचे हृदय चालू आहे म्हणूनच तो जिवंत म्हणायचा. श्रीमहाराजांना आपल्याविषयी असेच वाटत नसेल का? 'नाम हा माझा प्राण आहे' असे म्हणणाऱ्या श्रीमहाराजांना आपण नाम घेत नसलो तर काय वाटत असेल? परमार्थदृष्ट्या आपण मृतावस्थेत आहोत असेच त्यांना वाटत असणार, फक्त आम्ही प्रपंच करत आहोत म्हणून आम्ही जिवंत आहोत असे समजायचे. अशा 'परमार्थदृष्ट्या मृत' भक्तांना 'अ-मृत' करण्यासाठी श्रीमहाराजांना आपली जिव्हा वहावी लागली. सतत सोप्या भाषेत उपदेश करीत राहावे लागले. मग त्या वाणीला 'अमृतवाणी'च म्हणायला हवे ना? मणिकर्णिकेच्या घाटावर श्रीमहाराजांनी प्रेताला जिवंत केले हा आपण एक मोठा चमत्कार समजतो, पण आपल्यासारख्या परमार्थदृष्ट्या मृत असलेल्या असंख्य भक्तांना नामाचे तीर्थ प्राशन करण्यास देऊन त्यांनी जिवंत केले हा खरं तर अतिशय महत्त्वाचा चमत्कार आहे.

थोडक्यात म्हणजे, जी वाणी विस्मरणात जाऊ शकणार नाही ती 'अ-मृत वाणी'. ज्या वाणीने परमार्थ दृष्ट्या मृत माणूस जिवंत होतो, ती 'अमृत वाणी'. तसेच अमृतापेक्षाही गोड असलेली ही 'अमृतवाणी'.

एका शब्दाचे दोन अर्थ असल्यास त्याला श्लेष अलंकार म्हणतात, पण 'अमृतवाणी' चे तीन अर्थ असल्यास त्याला कोणता अलंकार म्हणायचे? खरं तर प्रत्येक मनाने किंवा हृदयात धारण करावा असा हा अलंकार म्हणजेच 'अमृतवाणी'.

॥श्रीराम॥

काव्य सुमने

## चैतन्याची पहाट झाली

आली नामाची ही दिवाळी आली ।
चैतन्याची ही पहाट झाली ॥धृ॥

रामनामात न्हाऊन गेली ।
दीप रामनामाचे उजळून गेली ॥

सडे पडण्या चैतन्याचे सुरू झाले ।
जप माळांचे तोरण बांधले ॥

समाधी मंदिरी रांगोळी सजली ।
ब्रह्मचैतन्य लावी नामाचा कंदील ॥

पाऊल पडता चैतन्याचे दारी ।
मन हरपून गेले  समाधी मंदिरी ॥

अष्टगंध भाळी लावीला भारी ।
उजळून गेली समाधी सारी ॥

हर्ष होई भक्तांच्या मनी ।
सूर उमटला नामाचा ध्यानी ॥

आली नामाची ही दिवाळी आली ।
चैतन्याची ही पहाट झाली ॥धृ॥

**डॉक्टर दिपक निकम**
सातारा

## ।। नामायदान ।।

आता नाम रूपात्मक देवे ।
येणे नाम यज्ञे तोषावे ।
तोषोनी मज द्यावे नामदान हे ॥१॥
खळ असो वा दुष्ट जन ।
करावे त्याने नाम धारण ।
दुरित तीमिर निरसन अज्ञानाचे ॥२॥
नामाशी असावे शरण केवळ ।
मानव धर्म जाणेल सकळ ।
नाम घेता मुखी कोमल ।
ईश्वरनिष्ठांच्या भेटी घडती ॥३॥
नाम कल्पतरूचे गाव ।
नाम चिंतामणीचा ठाव ।
नाम अमृताची ठेव ।
नाम तापहीन  सूर्याचे ॥४॥
नाम घेता अलांछन ।
नामी रंगता तनमन ।
नामे संसाराची बोळवणं ।
नाम सोपान तीन लोकीचा ॥५॥
नाम घेता मुखी नित्य ।
नामाने होय प्रसन्नचित्त ।
नामाने घडेलभेट ।
श्रीराम प्रभूची ॥६॥
नामे नयनी वसे नारायण ।
नामे टळेल जन्म मरण ।
नामधारक सेविती चरण ।
अनन्य होऊन ब्रम्हचैतन्यांचे ॥७॥

**गणेश दास**
वडगाव बुद्रुक, पुणे

# वैद्य काका...पुनरागमनायच



गणपती बाप्पास निरोप देताना आपण “पुनरागमनायच” म्हणून डोळ्यात पाणी आणून त्यास निरोप देतो. आम्हा स्वागत सेवेकाऱ्यांसाठी मात्र या शब्दाची नाळ एका वेगळ्याच व्यक्तिमत्वाशी जोडली आहे. ते आहेत आपल्या सगळ्यांचे प्रिय बदलापूरचे आदरणीय कै. वैदय काका.

स्वागत सेवेस असताना आपआपल्या पाळीनुसार दहा दिवस आम्ही सेवेस जात असू. आपले काम आटोपून निघताना न चुकता वैदय काकांचा निरोप घेऊनच प्रत्येक सेवेकरी निघत असे. “पुनरागमनायच” हा काकांचा निरोप ऐकण्यास आमचे कान उत्सुक असत. आपल्या पुन्हा येथे येण्याची कोणीतरी प्रेमाने वाट पाहतो आहे हा अनुभवच आमच्यासाठी फार सुखाचा असे. आजही अत्यंत प्रसन्न व शांत चेहऱ्याचे काका डोळ्यासमोर उभे राहतात.

स्मृती सुमने

स्वागत कक्षात ते सहसा आमच्या मागच्या बाजूस खुर्चीवर बसत. काका मागे असलेत की आम्हा सर्वांनाच त्यांचा फार मोठा आधार वाटत असे. कक्षाच्या कामजामावर त्यांची तेथून बारीक नजर असे. बरेचदा येणारे काही पाहुणे आमच्या परिचयाचे नसत. कक्षाच्या शिस्तीप्रमाणे निवास व्यवस्थेचे नियोजन करण्यापूर्वी आम्हा सेवेकऱ्यांना त्यांची (चौकशी) माहिती विचारावी लागे. अशा वेळी काही प्रसंगी काका लगेच मागून मोठ्याने सांगत, “अरे ते आपल्या यांच्या... असे असे... नात्यातील आहेत किंवा अरे ते आपल्याकडे... अशा अशा सेवेस बराच काळ होते. करा करा, त्यांची चांगली निवासाची सोय करा.” समोरील व्यक्ती चमकून आवाजाच्या दिशेने पाहत असे. त्याच्या चेहऱ्यावर लगेच परिचयाचे हास्य उमलत असे. मग परस्पर नमस्कार, मोठ्याने हसून त्यांचे आगत स्वागत व घरच्यांची चवकशी इत्यादी होत. आमचे चौकशीचे काम मात्र त्यामुळे खूप सोपे होई व वेळ पण वाचे.

काकांचा परिवार म्हणजे श्री महाराजांची माणसेच असत. प्रचंड ओळखी, मैत्री, सगळ्यांशी असलेले प्रेमाचे संबंध व जवळीक व अत्यंत महत्वाचे म्हणजे या वयातील त्यांची कुशाग्र स्मरणशक्ती. सत्तरी गाठायच्या आधींच नाव विसरतो अशा आम्हा सर्वांना त्याचे फार आश्चर्य वाटे. खुर्चीवर बसल्या बसल्या अचानक ते कक्षासमोरून जाणाऱ्या एखादया व्यक्तीस त्याच्या नावाने मोठ्याने हाळी देऊन बोलावीत. त्या व्यक्तीने आवाजाच्या दिशेने मागे बसलेल्या काकांना पाहिले की एक ओळखीचे, आपुलकीचे, दिलखुलास हास्य त्याच्या तोंडावर येई. मग नमस्कार, त्याच्या घरच्यांची विचारपूस, इत्यादी झाल्यावर अतिशय प्रसन्न चेहऱ्याने ती व्यक्ती काकांचा निरोप घेई. असे प्रसंग बहुतेक सर्वच स्वागत सेवेकऱ्यांनी अनुभवले आहेत.

ती व्यक्ती गेल्यावर मग काका त्याच्या संबंधीत चा एखादा जुना किस्सा/अनुभव सांगत. प्रत्येक गोष्टीचा शेवट श्रीमहाराजांशी होत असे. जणू त्यांना बोलण्यास केवळ हाच एक विषय होता. मी तरी त्यांना कधी राजकारण किंवा इतर विषयावर बोलताना ऐकले नाही. काका अशा मौलिक अनुभवांचे-आठवणीचे भांडार होते. मोकळ्या वेळी ते श्रीमहाराजांच्या संबंधित अनेक गोष्टी सांगत असत. दुर्दैवाने आम्ही ते टिपून ठेवले नाही याची आज खंत वाटते.

कै. काकांचा (त्यांना घरी दादा म्हणत) जन्म १२ जून १९३३ रोजी दापोली येथे झाला. त्यांची कर्मभूमी चेंबूर, वरळी, बदलापूर होती. निवृत्त झाल्यावर साधारण १९९६-९७ पासून ते गोंदवल्यास श्रीमहाराजांच्या सेवेत होते. मुख्य उत्सवाच्या बरोबरीनेच ते बरेचदा सलग ६-७ महिने गोंदवल्यास मुक्कामास असत. पहारा, काकडयास लोणी-साखर वाटप अशा सेवांबरोबरच ते प्रामुख्याने स्वागत कक्षात सेवेस असत. त्यामुळे त्यांना जवळपास सर्वच सेवेकऱ्यांची व श्रीमहाराजांच्या माणसांची ओळख होती. महत्वाचे म्हणजे आपुलकीचे संबंध होते व ते त्यांनी अखेरपर्यंत जपून ठेवलेत. शांत व प्रसन्न चेहेऱ्याने हात मागे बांधून ते आवारात अगदी हळूहळू फिरत. त्यांचा दिनक्रम शिस्तबध्द होता. रोजच्या काकडा, दुपारचे विष्णूसहस्रनाम, कीर्तन, त्यांचे कधीच चुकले नाही. आम्हाला पण ते आग्रहाने विष्णुसहस्रनाम म्हणण्यास घेऊन जात. कक्षात बसल्यावर बाहेरच्यांच्या इतकीच ते आम्हा सर्व सेवेकऱ्यांची पण काळजी घेत. आम्ही न्याहारीस, प्रसादाला वेळेवर जातो ना याकडे त्याचं लक्ष असे. एखादे प्रसंगी गर्दी फार असल्यास ते स्वतः डेस्क सांभाळून आम्हाला प्रसाद घेऊन येण्यास सांगत. गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी उत्सवास जर नेहमीच्या सेवेकऱ्याचे काही कारणाने येणे झाले नाही तर ते अगदी आवर्जून प्रसादाचे लाडू त्याच्या घरापर्यंत पोहोचवण्याची सोय करीत. बरेचदा आम्ही पण या उपसेवेत सहभागी असू. जितक्या प्रेमाने ते आमची सर्वांची काळजी घेत तितक्याच हक्काने वेळप्रसंगी कानपिचकी पण देत असत. शिस्त बिघडलेली त्यांना खपत नसे. खोली संबंधित तक्रार वहीची ते अधूनमधून पाहणी करीत व खोलीतल्या तक्रारींचे निवारण वेळेत झाले नसेल तर इतर वेळी शांत असलेले व सौम्य बोलणारे काका संस्थानच्या कायमस्वरूपी सेवेकऱ्यासही धारेवर धरायचे.

मला काकांची विशेष लक्षात राहण्यासारखी आठवण म्हणजे घडलेला प्रसंग मागे सोडून पुढे पाहण्याची त्यांची सकारात्मक विचारसरणी. स्वागत कक्षाच्या जबाबदारीचे क्षेत्र विस्तारित असल्याने सेवेकऱ्याचा एकाच वेळी अनेक आघाडयांवर लोकांशी संपर्क येतो. निर्णय चटकन घ्यावा लागतो. कधीतरी नंतर लक्षात येत असे की निर्णयात थोडी चूक झाली. पण वेळ निघून गेलेली असते. अशा वेळी चर्चा करणे त्यांना अजिबात आवडत नसे. प्रसंगी ते दटावत, “आता होऊन गेले ना? मग विसरून जा ते. त्यावर जास्त विचार करू नका. पुढे काय करता येईल ते पहा.” सर्वच प्रसंगात ‘श्रीमहाराजांचा हात’ पाहून तेच सर्व काही करीत आहेत यावर त्यांची अतीव श्रध्दा होती. त्यामुळे ते विशेष काळजी करत नसत. नियोजन ते फार बारकाईने करीत. कक्षात पुढील पाळीच्या सेवेकऱ्याला कक्षात घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची माहिती असावी म्हणून त्यांनी एक वेगळी व्यवस्था घालून दिली. त्यावर त्यांचे बारीक लक्ष असे. पुढे प्रकृती कारणाने त्यांना गोंदवल्यास सलग राहता येत नसे. “कोविड” साथीनंतर ते आसपास थांबलेच. मी बरेचदा त्यांच्याशी फोन वर बोलत असे. बदलापूरला शरीराने असले तरी मनाने ते कायम गोंदवल्यास असत.

स्वागत कक्षातील आमचे गुरुबंधू श्री निपुणगे यांचेशी ते सतत फोन संपर्कात असत, गोंदवल्याची खबरबात घेत. अशाच एका दिवशी बदलापूरहून फोन आला तो काकांचे चिरंजीव श्री नंदू वैदय यांचा. २८ ऑगस्ट २०२१! काका आपल्या सगळ्यांना सोडून गेलेत. श्री निपुणगे यांनी ती दु:खद वार्ता ग्रुपवर टाकल्यावर सर्व स्वागत परिवार व काकांचे अनेक चाहते हळहळले. काका आता अशा प्रवासास निघाले होते की आम्हाला त्यांना “पुनरागमनायच” अस म्हणणे शक्यच नव्हते.

सुधीर श्रीपाद जोशी, पुणे




# चैतन्य सदन, सातारा

**श्री ब्रह्मचैतन्य महाराजांचे साधकांचा मेळा**

मंगळवार पेठ सातारा येथील चैतन्य सदन हे गोंदवले येथील श्रीब्रह्मचैतन्य महाराज समाधी मंदिर ट्रस्टची मालकी असलेले आणि त्यांच्या अधिपत्याखाली चालणारे सातारा येथील केंद्र आहे. या केंद्रामध्ये होणारे सर्व कार्यक्रम म्हणजे संध्याकाळी ६ ते ७ वा सदनमधील उपासनेपासून येथे होणारे सर्व विविध कार्यक्रम (भजन, कीर्तन, पारायण, दासबोध निरूपण, हनुमान उत्सव) इत्यादी कार्यक्रम याचे सर्व सूत्रबध्द नियोजन श्रीब्रह्मचैतन्य महाराजांचे अर्थात चैतन्य साधक श्री. नंदकुमार इनामदार हे पाहतात. चैतन्य सदन परिवार सातारा या ग्रुपचे सर्वसाधारणपणे ४५० श्रीमहाराजांचे भक्त सदस्य आहेत. या गृपचे ॲडमीन म्हणून श्री. नंदकुमार इनामदार हे काम पाहतात. हे चैतन्य सदन खरोखरच चैतन्याचा ठेवा आहे चैतन्याचा झरा आहे याठिकाणी रामनामाचा जप आणि रामनामाचा ध्यास लागलेले असंख्य साधक मोठ्या भक्तीभावाने येथे एकत्र येतात आणि दररोज संध्याकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत येथील उपासनेचा लाभ घेतात. याठिकाणी कोणताही दुजा भाव नाही कोणीही या ठिकाणी येऊन उपासनेचा आनंद घेऊ शकतात. उपासना करू शकतात. त्याच प्रमाणे श्रीरामाचे तसेच श्रीब्रह्मचैतन्य महाराज, श्री ब्रह्मानंद महाराज आणि श्रीस्वामी समर्थांचे दर्शन घेऊ शकतात. तेच श्रीरामभक्त भक्तिभावाने येथील प्रसाद घेऊन तृप्त होतात आनंदी होतात. या चैतन्य सदनच्या वास्तूमध्ये रामनामी चैतन्य ओसांडून वहाते आहे.

गेले १० ते १२ वर्षापासून या चैतन्य सदन मध्ये नित्यनियमाने श्री गोंदवलेकर महाराजांची उपासना चालू आहे. दरवर्षी याठिकाणी श्रावण महिन्यात सात दिवसाचे पारायण सोहळा साजरा होतो त्यासाठी जवळपास २५० ते २९० इतक्या संख्येने साधक यात सहभागी होतात. अतिशय भक्तिमय आणि उत्साह पूर्ण आनंदाचे वातावरणात हा रम्य व मन प्रसन्न करणारा सप्ताह साजरा होतो. या पारायण सोहळ्यात “विष्णू सहस्रनाम” हनुमान चालिसा, रामरक्षा, मारूती स्तोत्र याचे पठण केले जाते नंतर पोथीतील ५ ते ६ अध्यायांचे सामुदायीक वाचन केले जाते. याचे





## श्रींची उपासना केंद्रे

मध्यंतरीच्या वेळी साधकाना चहा तसेच प्रसाद म्हणून गोड पदार्थ देऊन दिवसाचा ३ तासाचा पारायण सोहळा कार्यक्रम संपन्न होतो. असा हा पूर्ण सप्ताह झाला की शेवटच्या दिवशी कीर्तन, श्रीमहाराजांची आरती करून महाप्रसाद साधकाना दिला जातो आणि अशाप्रकारे हा श्रावणातील पारायण सोहळा चैतन्य सदनच्या वास्तूत मोठ्या आनंदाने तसेच मोठ्या भक्तीभावाने साजरा होतो. याचे सर्व नियोजन व कार्यवाही श्री नंदकुमार इनामदार आणि त्यांचे सहकारी सर्वश्री संतोष धोत्रे, हरिषचंद्र बोंडे, जी. डी. कुलकर्णी, अनिल पानसे आणि इतर साधक मिळून करतात. चैतन्य सदनच्या छोट्याश्या वास्तूतही ४५० ते ५०० लोकांचा साधकांचा महाप्रसाद केला जातो आणि कसलीही घाई गडबड न करता सूत्रबद्ध आणि नियोजनबद्ध महाप्रसाद घेण्याचे अन्नदानाचे काम पूर्ण होते. अनेक महाराजांचे निष्ठावंत भक्त साधक वेळात वेळ काढून या कार्यक्रमाला हजेरी लावतात. ही श्रीब्रह्मचैतन्य महाराज यांचेवर असणाऱ्या श्रद्धेचे हे फलित आहे. सौ. उषाताई कुलकर्णी, श्रीमती अलका नाफड मॅडम यांच्या सारखे अनेक स्त्री आणि पुरूष साधक व इतर श्री ब्रह्मचैतन्य महाराजांचे साधक आपली सेवा याठिकाणी वेळोवेळी सादर करतात.




असा हा चैतन्याचा ठेवा असलेले सातारा येथील चैतन्य सदन हे चैतन्याचे मंदिर आहे. येथे येणारे प्रत्येक भक्ताला प्रत्येक साधकाला उपासनेसाठी बळ मिळते. प्रत्येक साधकाच्या हृदयात श्रीरामनामाची ज्योत प्रज्वलित होऊन मन भक्तिरसात ओथंबून जाते असा अनुभव येतो. असा हा चैतन्याचा ठेवा श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या राजधानी सातारसारख्या शहरात आहे याचा सर्व सातारकराना अभिमान वाटावा अशीच गोष्ट आहे. मी एवढेच म्हणेन,

मंगळ पेठी वसली मंगल अशी चैतन्यसदन नगरी,<br>
जेथे श्री रामनाम वसे सर्व साधकांचे ध्यानी मनी.<br>
जणू चैतन्याचा ठेवा तुम्हासाठी ठेविला<br>
जपुनी श्री ब्रह्मचैतन्य महाराजांनी.

चालता, बोलता, काहीही धंदा करीता, खाता, जेविता श्रीराम नाम घ्यायला विसरू नये असे श्री समर्थ रामभक्तांना सांगतात. अखंड रामनाम घेत राहावे. कितीही संकटे आली, कितीही सुख पायाशी लोळत असले तरी रामनाम घेण्याचे विसरू नये असे श्री समर्थ आवर्जुन भक्ताना सांगतात. थोडक्यात सांगायचे झाले तर रात्रंदिवस अहोरात्र झोपेतसुध्दा श्री रामनाम घ्यावे सुखात, दुःखात, आनंदात कठीण प्रसंगात, वैभवात, वैराग्यात रामनाम घेण्याचे विसरू नये.

श्रीब्रह्मचैतन्य महाराजांनी श्री रामनामाचा हिमालय उभा केला आहे. या गोंदावले चैतन्य नगरी श्री रामनामाचा महापूर आलेला आहे. त्या रामनामाच्या महासागरात आपण सर्वांनी बुडून जावे अशीच श्रीमहाराजांचरणी प्रार्थना!

डॉक्टर दिपक निकम, सातारा.

# साधन चतुष्टय

श्रीराम ॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीराम रामाय नमः ॥ प्रथम नित्यानित्य विवेक करावा. तो असा कीं:– नित्य हा आत्मा, अनित्य देहादि सर्व प्रपंच ॥ तरी अनित्यास उदास होऊन नित्य जो आत्मा त्याकडे पाहणे, या नांव नित्यानित्य विवेक म्हणावें. इहामुत्र फलभोग विराग. इह म्हणजे हा लोकः– अमूत्र म्हणजे परलोक. या उभय लोकांचे फल भोगाची इच्छा न धरणें; कारण ते नाशिवंत आहेत. विराग म्हणजे शम– दमादि साधनें करावी. शम म्हणजे मनास दुष्ट वासनेकडे जाऊ न देणें; जाईल तर परत फिरविणें. दम म्हणजे शब्दादि विषयापासून फिरवून भगवद्भजनीं लावणें. तितिक्षाः– इह परलोकीं अन्याय नसता जांच होणारा (हा) उर्मी न उठतां सहन करणें. श्रद्धाः – गुरु वचनीं दृढ विश्वास ठेवणें ।। समाधानः– हर्ष विषाद न बाळगता योगानुसार ज्यावेळीं जे होईल त्यांत संतोषित राहणे, अध्यात्मक, प्रपंचाची चिंता वाहणें आधि भूतीक, दुसऱ्याकडून पीडा होणें. आधि दैविक, दैवी क्षोभाने दुःख पावणें. मुमुक्षुः– जन्ममरणापासून सुटून आत्माराम कधीं पाहीन; सद्गुरु कधीं भेटेल अशा अनुतापांत रात्रं–दिवस असणें.

येणें प्रमाणें साधन चतुष्टयाचा अभ्यास करून मग सद्गुरूस शरण जावें आणि सार्थक करून घ्यावें. सद्गुरु कृपा होण्यास मुमुक्षतां असलीच पाहिजे. तर ती या साधन चतुष्ट्याचें अभ्यासानें प्राप्त होते ॥ श्रीराम ॥

–ज्ञानोपदेश